Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

सत्र पहिले

## घटक १ : उपयोजित नीतिशास्त्र आणि पर्यावरणाचे नीतिशास्त्र.

अ) उपयोजित नीतिशास्त्र

१.१ उपयोजित नीतिशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व

ब) पर्यावरणाचे नीतिशास्त्र

१.२ पर्यावरण नीतिशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व
१.३ मानवकेंद्रवाद, जैवकेंद्रवाद, पर्यावरणकेंद्रवाद.
१.४ आल्डो लिओपोल्ड यांचे भूमि नीतिशास्त्र.
१.५ शाश्वत विकासाची कल्पना.

*****************************************************

## अ) उपयोजित नीतिशास्त्र

### १.१ उपयोजित नीतिशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व

**पार्श्वभूमि व प्रस्तावना :**

**व्युत्पत्ती (Etymology)**

नीति हा संस्कृत शब्द असून ' नी ' म्हणजे नेणे, घेवून जाणे.म्हणून जी मार्गदर्शन करते ती नीती. जी जीवन कसे न्यावे ते सांगते ती नीती.त्यामुळेच नीती म्हणजे जगण्याची रीती. नीतीला इंग्लीशमध्ये Morality म्हणतात. लॅटीन भाषेतील Moras म्हणजे समान वागण्याची पध्दती, या शब्दांपासून Morality हा शब्द बनतो. Morality चे शास्त्र म्हणजे Moral Philosophy. Moral Philosophy ला इंग्रजीत Ethics हा पर्यायी शब्द आहे. तो प्राचीन ग्रीस भाषेतील Ethos या शब्दापासून बनतो. Ethos म्हणजे सामाजिक चालीरिती, सामाजिक वर्तन किंवा सर्वमान्य वागणूक.

हे सर्व उगम पाहता हे सर्व शब्द किंवा संकल्पना परस्पर पर्यायी किंवा भाषांतर म्हणून वापरले जातात , हे लक्षात घ्यावे.

**नीतीनियमांचे स्वरुप :**

नीती-नियम व्यक्ती व समाज यांच्या सर्वमान्य वर्तनांचे निकष स्पष्ट करीत असतात. त्या नियमांचे स्वरुप जसे असेल, तसे जीवनाचे स्वरुप बनते.नियम दोन प्रकारचे असतात. अपरिवर्तनीय व परिवर्तनीय.नैतिक नियम दोन्हीही स्वरुपाचे असतात. काही नैतिक नियम अपरिवर्तनीय असतात. तर काही परिवर्तनीय असतात. चोरी करु नये, दिलेला शब्द पाळावा, हे अपरिवर्तनीय नियम आहेत. तर स्त्रियांना शिक्षण देऊ नये, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था पाळावी, हे नियम परिवर्तनीय आहेत किंवा होते. म्हणूनच ते आज बदलले आहेत.

नैतिक नियम कधी बदलतात ? तर सामाजिक धारणा, गरजा, वैज्ञानिक प्रगती इ. नुसार त्यांत बदल होतो. जुन्या नियमांच्या जागी नवे नियम येतात .ते जुने होतात तेंव्हा पुन्हा नवे नियम येतात.असे नेहमीच घडत राहातो.तेव्हा असे म्हणता येईल की, नीतीचे नियम हे नेहमी नव्या नैतिक निकषांचा शोध घेतात. नव्या परिस्थितीत काय योग्य आहे, चांगले आहे, हे नीतीशास्त्र शोधत असते. त्यामुळेच नीतीशास्त्राच्या व्याख्या नेहमी बदलत गेल्या. त्यातील काही व्याख्या एका वाक्यात आपण पुढीलप्रमाणे सांगू शकतो.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

**व्याख्या :**

1. सदाचरणाचे शास्त्र म्हणजे नीतीशास्त्र.
2. कर्तव्याचे शास्त्र म्हणजे नीतीशास्त्र.
3. प्राप्तव्यांचे शास्त्र म्हणजे नीतीशास्त्र.

या व्याख्यांमधून नीतीशास्त्राचे काही प्रकार अस्तित्वात येतात, ते पुढीलप्रमाणे -

**1) वर्णनात्मक नीतिशास्त्र :**

नैतिक आचरणाचे केवळ वर्णन करते, ते वर्णनात्मक नीतिशास्त्र.उदाहरणार्थ सदाचरण म्हणजे नीति . म्हणून सदाचरणाचे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र.

**2) आदर्शात्मक नीतिशास्त्र :**

व्यक्ती व समाजाकडे कोणता आदर्श असावा, याचे स्पष्टीकरण देणारे ते आदर्शात्मक नीतिशास्त्र.उदाहरणार्थ सुखी जीवन , कर्तव्य करणे, मोक्ष, इ.इ

**3) अधि-नीतिशास्त्र : (Meta Ethics)**

Meta म्हणजे about किंवा beloynd म्हणून Meta-Ethics म्हणजे नीतिशास्त्रांचीच चिकीत्सा करणारे, ते अधि-नीतिशास्त्र.नैतिक संकल्पनांचे विश्लेषण यात केले जाते. जॉर्ज एडवर्ड मूर आणि ए.जे.एयर हे अधिनीतिवादी तत्त्वज्ञ होत.

नीतिशास्त्र कोणत्या प्रकारचे असले तरी, ते ज्या काही मूलभूत संकल्पनांचा विचार करते, त्यांना ' मूलभूत नैतिक संकल्पना ' म्हणतात.त्या पुढीलप्रमाणे -

1.हक्क (Right ) 2. कर्तव्य (Duty) 3. शिव (God)

थोडक्यात नीतिशास्त्र ' नैतिकता ' या संकल्पनेचा अभ्यास करते. कोणती कृती कशामुळे नैतिक ठरते, या निकषांचा अभ्यास नीतिशास्त्र करते. कशास नैतिक म्हणावे, याचे निकष सतत बदलत जातात. आता नीति अशी कायम बदलती असावी का ? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचीही चर्चा नीतिशास्त्र करते. या सगळया पेचामध्ये / तणावांमध्ये समाज नेहमीच गोंधळतो. नवे शोध घेतो, आणि त्यातूनच गेल्या काही वर्षात आणखी एक नैतिक सिध्दांत पुढे आला. तो म्हणजे उपयोजित नीतिशास्त्र. आपण त्याच्याच अभ्यास करणार आहोत. त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे -

**4) उपयोजित नीतिशास्त्र : स्वरुप**

ही तत्त्वज्ञानाची अशी शाखा आहे की, जी जीवनाला थेटपणे भिडणाऱ्या नैतिक समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी आणि त्या समस्या सोडविण्यासाठी नैतिक सिध्दांताचे आणि तत्त्वज्ञानात्मक पध्दतीचे उपयोजन करते. म्हणजेच तत्त्वज्ञानातील आणि नीतिशास्त्रातील विविध सिध्दांताचा साक्षात, थेट कसलाही आडपडदा न ठेवता जीवनातील ,जगण्यातील काही महत्वाच्या प्रश्नांशी कसा संबंध आहे, ते दर्शविते, याचाच अर्थ नैतिक सिध्दांत आणि व्यवहार यांची हे सांगड घालण्याचा प्रयत्न उपयोजित नीतिशास्त्र करते आणि गरज असल्यास नवा सिध्दांत मांडते. उदा. गर्भपात, आत्महत्या, दयामरण, पर्यावरण, प्रदुषण इ. हे सर्व प्रश्न प्रसिध्दी माध्यमातून पुढे येतात. पण त्यांची सखोल व तत्त्वज्ञानात्मक चर्चा केवळ उपयोजित नीतिशास्त्र करते.

थोडक्यात, नैतिक संकल्पनांचा इतिहास पाहता, नीतीशास्त्राचे चार प्रकार मानले गेले. वर्णनात्मक नीतिशास्त्र (डीस्क्रीप्टीव्ह), आदर्शवादी नीतिशास्त्र(नॉर्मेटीव्ह किंवा प्रिस्क्रीप्टीव्ह ),अधिनितीशास्त्र (मेटाएथिक्स), उपयोजित नीतिशास्त्र (अप्लाईड एथिक्स).

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

## उपयोजित नीतिशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी

उपयोजित नीतिशास्त्राचा उदय व विकास होण्यामागे तीन कारणे होती, असे म्हणता येते. पहिले कारण म्हणजे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात नवी विश्लेषण पद्धती रूढ झाली आणि दुसरे कारण पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांनी नवे नैतिक प्रश्न निर्माण केले. तिसरे कारण अगदी अलिकडील म्हणजे १९९० चे जागतिकीकरण हे आहे.

### (१) उपयोजित नीतिशास्त्राचा उदय व विकास होण्यामागील पहिले कारण

तत्त्वज्ञानातील विश्लेषण पद्धतीमुळे नीतीच्या क्षेत्रात नवा विचार सुरु झाला. तत्त्वज्ञानातील ***प्रत्यक्षार्थवाद*** या नावाने ओळखला जाणारा सिध्दांतच यांस कारणीभूत ठरला. 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात विज्ञानवादी तत्त्वज्ञांनी 'सर्व ज्ञानाचा आधार हा फक्त अनुभवच असतो ' असे मानले व त्यामुळे ' अनुभवास येणारे ज्ञान हेच खरे ज्ञान ' अशी धारणा फक्त केली. हाच निकष या वादाने नीतिशास्त्रास व सौंदर्यशास्त्रास लावून टाकला, जी मुळात मूल्यशास्त्रे आहेत ! या तत्त्वज्ञांनी दावा केला की, नीति व सौंदर्य या बिनबुडाच्या अशास्त्रीय गोष्टी आहेत.

**एयरचा भावनिकतावाद**

ए. जे. एयर या तत्त्वज्ञाच्या या मते, तत्त्वज्ञानाचे योग्य कार्य म्हणजे विधानांचे तार्किक विशेलषण करणे. जी विधाने अनुभवाच्या कसोटीवर उतरतात ती सत्य म्हणून स्वीकारली गेली पाहिजेत.त्यामुळे नैतिक विधानाची तपासणी विश्लेषण पध्दतीने करणे आणि त्यांचे वर्गीकरण अर्थपूर्ण, निरर्थक / अर्थशून्य अशा प्रकारांमध्ये करणे हेच आहे. त्यामुळे एयर म्हणतो की, ज्ञानाची शाखा म्हणून नीतिशास्त्राचा काहीही उपयोग नाही. वक्त्याच्या भावना व्यक्त करण्यासाठी आणि इतर व्यक्तींमध्ये तशा भावना निर्माण करण्यासाठी ही तथाकथित नैतिक विधाने केली जातात. ती सत्य / असत्य, योग्य अशी काहीही नसतात. या एअरच्या मतास **' भावनिकवाद '** म्हणतात.

एयर आणि इतर विज्ञानवादी तत्त्वज्ञ असा निष्कर्ष काढतात की, नीतिसंकल्पना या मिथ्या संकल्पना आहेत. त्यामुळे त्यांचे विश्लेषण शक्य नाही, हे सांगणे हेच तत्त्वज्ञानाचे काम आहे, चांगले, वाईट, कर्तव्य जबाबदारी असल्या नैतिक पदांनी केवळ भावना व्यक्त होतात. म्हणून त्यांचा अभ्यास समाजशास्त्र, मानसशास्त्र अशा सामाजिक शास्त्रात करावा. नैतिक नियमांची एक सर्वमान्य प्रणाली म्हणून नीतिशास्त्र नावाची कोणतीही गोष्ट नसते.

हा पारंपरीक नीतिशास्त्रावर आणि अधिनितीशास्त्रावर प्रचंड मोठा हल्ला होता. आधी पारंपरीक नीतिशास्त्र कोसळले. लोकांचा व विचारवंताचा चांगल्या वागणुकावरचा विश्वासच उडाला. ' चांगले - वाईट वागणे हे केवळ भावनिक असेल तर मला जे चांगले वाटते, तसा मी वागेन' असा सापेक्षतावाद येऊन त्याचा विपरीत परिणाम समाजावर झाला. लोक वेगवेगळया प्रसंगी वेगवेगळया पध्दतीने वागू लागले.

दुसरीकडे अधिनीतिशास्त्राला कामच उरले नाही ! " नैतिक विधाने ही मिथ्या विधाने आहेत. नीतिशास्त्र शक्य नाही, हे सांगणे" एवढेच त्यांचे काम उरले. म्हणून नंतरच्या तत्त्वज्ञांनानी एअरची टिका सौम्य केली. त्यांच्यामते, जसे खेळाचे स्वातंत्र्य नियम असतात तसेच भाषिक खेळांचेही स्वतंत्र नियम असतात. नीतिशास्त्र हा सुध्दा एक भाषिक खेळ आहे. त्यांचे तर्कशास्त्र वेगळे आहे, त्याचे नियम वेगळे आहेत एवढेच ! नैतिक विधाने सत्य, योग्य असे काही नसतील सुध्दा पण अशा विधानांमधून स्विकारण्यासारखे, विचार करण्यासारखे असे काहीतरी नक्कीच असते. म्हणून तर आपण नैतिक जीवन जगतो.हे त्यांनी व्यक्तींच्या व समाजाच्या नैतिक धारणा पाहून स्पष्ट केले. हा भेद मुख्यतः व्यक्तीची वैयक्तीक नीति व व्यावसायिक नीति यातील फरकाने पुढील प्रमाणे स्पष्ट केले.

### वैयक्तिक नीती व व्यावसायिक नीती (Personal Ethics and Professional Ethics)

नैतिक जीवनाचा विचार करताना व्यक्तीचे खाजगी व व्यावसायिक जीवन यांत फरक केला जात असतो, ही त्याची जाणीव प्रथम **ऑर्थर हॅडली** या तत्त्वज्ञाने 1907 साली लक्षात आणून दिली. **सार्वजनिक नीतीची पातळी** 'The

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com
------------------------------------------------------------------------------------------------------------------

Standards of Public Morality' या ग्रंथात तो अमेरिकन नागरीकांविषयीचे तो निरीक्षण नोंदवितो. ते असे '' अमेरिकन नागरीक'' हा खाजगी जीवनात श्रेष्ठ चारीत्र्याचे दर्शन घडवितो. दुर्बलांशी आदरयुक्त सभ्यता, श्रेष्ठांशी स्वाभिमानी, स्त्रिया व मुले यांच्याशी आदर व नम्रता, मित्रांशी अत्यंत उदार अंतकरणाने, शेजाऱ्यांशी प्रेमाने असे एकूण सर्वांना उपयोगी पडणारा तो परोपकारी गंपू असतो. तो लबाडी, स्वार्थ, शुद्रता करीत नाही. आपत्तीच्या वेळी चांगला मदतनीसही असतो. पण ती व्यक्ती व्यापार, नोकरी, राजकारण इ. ठिकाणी प्रतिस्पर्धेला नामशेष होते. राजकीय उलथा-पालट किंवा सामाजिक अडचणीच्या वेळी तो व्यावसायिक म्हणून जास्त स्वार्थी असतो. दुर्बलांना टाचेखाली आणतो तर सबलांना अशारितीने एकाच व्यक्तीचे खाजगी आणि सार्वजनिक नीतिमान वेगळे असते. हॅडलीचे अमेरिकन बाबतचे हे निरीक्षण किती खरे आहे किंवा भारतीय नागरीकांत तशी प्रवृत्ती आढळते का ? हा प्रश्न येथे नाही, तर व्यक्तीच्या वैयक्तीक आणि व्यावसायिक वर्तनात एवढी तफावत असते की, या दोन अंगाचा विचार स्वतंत्र्यपणे सुचवतो. एखादी व्यक्ती दयाळु, प्रेमळ, करुणामय, विनयशील इ. सद्गुण असलेली व्यक्ती राजकारण, उद्योग, लष्कर, व्यापार, व्यवस्थापन इ. पेशा व व्यवसायासाठी लायक आहेत का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. पुष्कळतः ही क्षेत्रे स्वार्थी, कपटी, धुर्त, महत्वाकांक्षी, निष्ठूर व्यक्तीसाठीच आहे. असे मानून सज्जन दुर राहतात. आणि अशाच क्षेत्रात यशस्वी ठरण्यासाठी लोकांचा वाईट ग्रह होतो.

या कारणांमुळे नीतिशास्त्रात असा विचार आला की, नेहमीचे पारंपरिक नीतिशास्त्र व व्यावसायिक नीतिशास्त्र यात फरक करणे आवश्यक आहे. पारंपरिक नीतिशास्त्र व्यक्तीचे खाजगी व सार्वजनिक जीवन नियंत्रित करते. पण सार्वजनिक जीवनाचे स्वरुपच असे झाले आहे की, ते जास्त व्यवसायात्मक झाले आहे. त्यामुळे या दोन प्रकारच्या जीवनात व त्यांच्या नीतित फरक करणे, आवश्यक झाले. अशाप्रकारे वैयक्तिक नीती आणि व्यावसायिक नीती यांत भेद करण्यात आला.

व्यावसायिक नीतिशास्त्र विविध व्यवसायानुसार नैतिक तत्त्वज्ञांनाचे स्वरुप ठरविते. कोणत्या व्यवसायात कोणती नैतिक तत्त्वे सदगुण ठरतात किंवा कोणती ठरत नाही. हे ठरविते. एखादा व्यावसायिक व्यवहार नैतिक व्हावा, म्हणून कोणत्या नीतितत्त्वांची आवश्यकता आहे. त्याचा खुलासा 'चांगले व्यावसायिक' या संकल्पनेचे स्वरुप स्पष्ट करते.

थोडक्यात, व्यावसायिकतेचे नैतिक निकष, जबाबदाऱ्या, हक्क, तत्वे, सद्गुण इत्यादींची चर्चा करणारे शास्त्र म्हणजे 'व्यावसायिक नीतीशास्त्र' होय._अर्थात, व्यावसायिक नितीशास्त्राचा संबंध पारंपरिक किंवा सार्वजनिक नीतीशास्त्राशी असला पाहिजे, असे एक मत आहे. म्हणजेच एकूण नैतिक जीवनाशी व्यावसायिक नीती सुसंगत ठरली पाहिजे. असा आग्रह आहे हे लक्षात घेतले पाहिजे.व्यावसायिक व वैयक्तीक नीतीशास्त्रातील फरकाविषयी दोन मते आहेत.

अ)खुली / सार्वजनिक नीती ब) बंदिस्त /विशिष्ट नीती

**अ) खुली / सार्वजनिक नीती**

खुल्या नीतिच्या दृष्टीकोनानुसार कोणतेही नैतिक तत्व सार्वजनिक नसेल, सर्वांसाठी खुले नसेल तर त्याला नैतिक म्हणताच येणार नाही. नीती तीच की जी स्थलकाल व्यक्ती, व्यवसाय, धर्म, लिंग, जात, देश निरपेक्ष असते त्यामुळे ' व्यावसायिक नीती ' म्हणून असे काहीही असू शकत नाही.

**ब) बंदिस्त / विशिष्ट नीती**

विशिष्ट नीती कल्पनेनुसार नीती सार्वजनिक असू शकते.पण सार्वजनिकता हा तिचा निकष नसतो. उलट नीती ही नेहमी बंदीस्त विशिष्ट गटापुरतीच असते ही नीती उघडचं सामाजिक नीतीपेक्षा वैयक्तिक नीतीला प्राधान्य देते. त्यानुसार व्यक्तीचे हक्क, कर्तव्य, सदगुण इ. गोष्टी तिच्या सार्वजनिक भूमिकेवरुन किंवा व्यक्तीगत जीवनात ती नीतीमान आहेत. म्हणून ठरत नाही तर ती विशिष्ट गटाची सदस्य असते. म्हणून तिचे सदगुण ठरतात .उदा. विशिष्ट कामगार संघटनेचा कार्यकर्ता म्हणून एखादा कामगार केवळ त्या संबंधीत कामगार संघटनेच्या सदस्यांच्या हक्क व हिताशीच निगडीत आहे. त्याचा एकूण मानवजातीचे हक्क किंवा जगातील कामगारांचे हक्क यांच्याशी संबंध नाही. तसेच

---

दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांची जबाबदारी मानवी समाजात न्यायाची प्रस्थापना करणे ही नसून केवळ दलितांना न्याय मिळवून देण्याची आहे. कारखान्याच्या संचालकाने कारखान्याची भरभराट कशी व्हावी, हे पाहावे राष्ट्रीय उत्पन्नाची काळजी करु नये, असे बंदीस्त नीती सांगते. अशारितीने एखादया व्यक्तीची नैतिकता सामान्य मानवी हक्क सदगुण कर्तव्य यातून ठरत नाही तर तिचे कुटुंब तिचा व्यवसाय तिचा गट व त्यातील तिचे हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या यातून ठरते हे लक्षात ठेवणे महत्वाचे म्हणजेच स्थलकाल व्यवसाय विशिष्ट किंवा सापेक्ष असेही नीतिचे स्वरुप ठरते. अशारितीने व्यावसायीक नीतिशास्त्र विकसित झाले.

अर्थात असे नव्हे की, सार्वत्रिक सर्वसामान्य नीतितत्वे असूच नयेत, ती असावीत. पण त्यांचे उपयोजन मात्र व्यवसाय सापेक्षच केला पाहिजे म्हणजे सार्वत्रिक नीतिची सांगड व्यावसायिक नीतिशी घातली पाहिजे. *प्राथम्य असेल ते व्यावसायिक नीतिला , सार्वत्रिक नीति ही दुय्यम असेल.*

### (२)उपयोजित नीतिशास्त्राचा उदय व विकास होण्यामागील दुसरे कारण

उपयोजित नीतिशास्त्राचा उदय व विकास होण्यामागील दुसरे कारण म्हणजे पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांनी निर्माण केलेले नवे नैतिक प्रश्न. ही महायुद्धे घडली, संहारक ठरली, त्यामागे विज्ञान व वैज्ञानिक प्रगती, नव्या तंत्रज्ञानाचा शोध ही कारणे होती. दुसऱ्या महायुद्धाने युद्ध, आंतरराष्ट्रीय संबंध, नववसाहतवाद, रासायनिक-आण्विक प्रकल्प इत्यादींना वाचा फोडली.या नीतीशास्त्राने जैव वैद्यकीय नीतिशास्त्र, व्यावसायिक नीतिशास्त्र आणि पर्यावरण नीतिशास्त्र या नव्या तीन ज्ञानशाखांना जन्म दिला. गर्भपात, दयामरण, फाशी, आत्महत्या, कामसंबंध, विवाह, युद्ध, माहिती तंत्रज्ञान, संगणक, राजकारण, समाजकारण, प्राणी मुक्ती आंदोलन, मोठ्या धरणाचे महाप्रकल्प, कामगार संघटना, रासायनिक-आण्विक प्रकल्प, तसेच वकिली, डॉक्टरी, पोलीस-लष्करी, सनदी सेवा, शिक्षण, मुख्य म्हणजे राजकारण ही सारी क्षेत्रे ही राष्ट्रसेवा की धंदा ? जागल्या (व्हिसल ब्लोअर) हे प्रश्न जास्त उग्र झाले.

### (३)उपयोजित नीतिशास्त्राचा उदय व विकास होण्यामागील तिसरे कारण

उपयोजित नीतिशास्त्राचा उदय व विकास होण्यामागील तिसरे कारण म्हणजे १९९० नंतरचे जागतिकीकरणाच्या लाटेचा परिणाम. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खा.उ.जा.) या तीन घटनांमुळे मानवी जीवन अधिक जटील , गुंतागुंतीचे ठरले. त्यांची उत्तरे केवळ नव्या नितीशास्त्राच्या आधारेच देणे शक्य होते. हे प्रश्न शुद्ध चारित्र्य, सद्‌हेतू, सदसद्विवेकबुद्धि, परोपकार, आत्मबुद्धी इत्यादींनी सोडविता येत नाहीत, हे उघडच आहे. त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व नीतीचे अभ्यासक, व्यावसायिक तत्त्ववेत्ते, तत्त्ववेत्ते यांच्या एकत्रित सहकार्याने सोडवावे लागतील, अशी जाणीव या नीतीशाखेने दिली. नीतिशास्त्र अशा तऱ्हेने **'आंतरविद्याशाखीय** ज्ञानशाखा बनले. यातून प्रत्येकाचे नीतिशास्त्र निर्माण झाले. माध्यमांचे, उद्योगसमूहाचे, व्यवस्थापनाचे नीतिशास्त्र जास्त महत्वाचे ठरले. या सगळयांना मिळून उपयोजित नीतिशास्त्र म्हंटले जाते. तेच आज मूलभूत चिंतनक्षेत्र ठरले आहे. कारण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचे व्यावसायीकरण झाले आहे

दुसरीकडे विज्ञान व वैज्ञानिक प्रगतीमुळे आज प्रत्येक क्षेत्रातील ज्ञान हे विशेष ज्ञान बनत आहे. ज्ञानात विशेषीकरण आले आहे. त्यामुळे एखादया ज्ञानशाखेतील नैतिक समस्यांची उत्तरे त्याच शाखेतील व्यक्ती देऊ शकते, असे घडत नाही. त्यासाठी तिला इतर क्षेत्रातील तज्ञांचीही मदत घ्यावी लागते. व्यवसाय विभिन्नता इतकी वाढली आहे की, आंतरक्षेत्रीय सहकार्य घेतल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रातील प्रश्न सुटु शकत नाही. त्यासाठी नवीन शास्त्र जे विकसीत करावे लागले ते ' उपयोजित नीतिशास्त्र '.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

अशा रितीने 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात नीतिशास्त्र व्यवसायप्रधान बनले. ही अत्यंत मुलगामी कलाटणी होय. 20 वे शतक मानवजातीच्या आयुष्यात अतिशय महत्वाचे व भयानक वेगाचे ठरले. अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था प्रचंड वेगाने बदलली आहे. विज्ञान व तंत्रज्ञान अफाट प्रगती करत आहे. अनेक गोष्टींचे संदर्भच बदलेले आहेत. या सगळयांचा परीणाम म्हणून व्यक्तिगत व सामाजिक जीवन अत्यंत गुंतागुंतीचे व समस्या प्रधान बनले.

**नैतिकतेच्या कक्षा रुंदावल्या / व्यापक झाल्या.**

उपयोजित नीतिशास्त्र ज्या परिस्थितीतून उद्भवले ती परीस्थिती अत्यंत गुंतागुंतीची, आव्हानात्मक होती. तिने जगण्याचे अनेक पैलू नव्याने समोर आणले. किंवा नवेच पैलू निर्माण केले. त्यामुळे नैतिकतेची कल्पनाच अमुलाग्र बदलली. ती पारंपरिक नीतिशास्त्राला छेद देणारी त्याच्या मर्यादा स्पष्ट करणारी होती.उपयोजित नीतिशास्त्र ही बौध्दिक घटनाच मुळात युरोपियन, पाश्चात्य आहे. त्यामुळे आपण ती त्या चौकटीत समजावून घेणे आवश्यक आहे.

अर्थात, उपयोजित नीतिशास्त्रातील ही सगळी तात्विक घडामोड म्हणजे अगदी अलीकडची बाब आहे, असे समजणे चुकीचे आहे. कारण आपल्या आधीच्या अनेक तत्त्वज्ञांनी त्यांच्या लेखणातून व्यावहारीक नैतिक प्रश्न उपस्थित केलेले होते. उदा. ॲरीस्टॉटल च्या मते नीतिशास्त्र ही गोष्ट मुळातच एक व्यावहारीक उद्योग आहे. ते व्यावहारिकदृष्ट्या उपयोगाचेच शास्त्र आहे. आपल्या नीतिशास्त्रात तो मैत्रीचे नीतिशास्त्र तसेच मृत्यू, सार्वजनिक न्याय, समता, स्वातंत्र यांची चर्चा करतो. मध्ययुगातील सेंट थॉमस ॲक्वीनास यास संत तत्त्वज्ञाने युध्द आणि लैंगिक संबंध व कामुकता या विषयावर मोठे-मोठे निबंध लिहीले. थॉमस हॉब्ज या तत्त्वज्ञाने राष्ट्रनिष्ठा, सैनिकी जीवन व त्याच्या उपयुक्तता आणि मानवता या समस्यांची चर्चा केली तर डेव्हीड ह्यूम, कांट आणि वाल्टेअर यांनी आत्महत्या, कैदयाला दिली जाणारी शिक्षा, फाशी, जागतिक शांतता या समस्यांची चर्चा केली. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात जेरेमी बथॅम या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञानाने फाशीच्या शिक्षेची चिकीत्सा केली. तर 19 व्या शतकात जे. एस.मिल्ल या तत्त्वज्ञाने त्याचा उदारमतवाद आणि स्वतंत्र्याचा उद्देश या गोष्टी, स्त्री, पुरुष या समतेसाठी व स्त्री मुक्तीसाठी उपयोगात आणला. रसेल, विटगेन्स्टाईन, कार्ल पॉपर या सारख्या तत्त्वज्ञांनी मैत्री, विवाह, लैगिक स्वातंत्र्य, जागतिक शांतता, युध्दविरोध यांच्यावर भर दिला.

## उपयोजित नीतिशास्त्राची प्रस्तुतता[1]

या व्यवसायातील नैतिक पेचप्रसंग पाहता नैतिक समस्यांचे वर्गीकरण जैव-वैद्यकीय नीतिशास्त्र, व्यवसाय व धंद्याचे नीतिशास्त्र, आणि पर्यावरणाचे नीतिशास्त्र अशा तीन मुख्य शाखांमध्ये करण्यात आले. क्लोनिंग, मानवी अवयवारोपण, मेडिक्लेम, महागडे वाटणारे वैद्यकीय शिक्षण; छोटे-मोठे धंदे ते बहुराष्ट्रीय कंपन्यामधील कर्मचारी व कंपनीचे समाजाशी असलेल्या नात्याचे स्वरूप, आणि आपली भावी मानवी पिढी, प्राणी-पक्षी जगत, अतिसूक्ष्म जीव, पर्यावरणीय व्यवस्था व एकूण निसर्ग, विश्व यांच्याशी आपले नाते कसे असावे, या नैतिक समस्यांच्या चिंतनातून अनुक्रमे या तीन शाखा उदयास आल्या.

वैद्यकीय संस्थांची रचना आणि व्यवसाय म्हणून वैद्यक विज्ञानाचे काम यांच्याशी जैव-वैद्यकीय किंवा वैद्यकीय नीतिशास्त्र निगडीत आहे. वैद्यकीय नीतिशास्त्रापेक्षा व्यवसाय व धंद्याचे नीतिशास्त्र खूप व्यापक व गुंतागुंतीचे आहे. या दोन्हींपेक्षा व्यापक आहे ते पर्यावरणाचे नीतिशास्त्र. आपली सामाजिक अभिवृत्ती आणि वर्तन, विशेषतः नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करण्याच्या व खाण्यापिण्याच्या मुलभूत सवयी आणि प्राणी व नैसर्गिक जग यांच्याबाबतीत असलेल्या आपल्या नैतिक अभिवृत्ती यांचा शोध यात घेतला जातो.या विविध अभिवृत्ती व सवयीमुळे एकूण पर्यावरणाचे आणि एकूण मानवी समाजाचे शोषण कसे होते, यावर पर्यावरणाचे नीतिशास्त्र उपाय शोधू पाहते.

---

[1] श्रीनिवास हेमाडे "नीतिशास्त्रांची पाने.." तत्त्वभान लेखांक ३७ दि. १८ सप्टेंबर २०१४ लोकसत्ता

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com
---

व्यवसाय म्हणून वैद्यक व्यवसाय हा व्यवसायाच्या नीतिशास्त्राचा आणि वैद्यकीय नीतिशास्त्राचाही अभ्यासविषय बनतो. यावेळी तो जास्त जटील होतो. पाश्चात्य-युरोपीयन राष्ट्रांमध्ये या तिन्हीपैकी जैव-वैद्यकीय नीतिशास्त्र महत्वाचे ठरले आहे. तिथे व्यवसाय व धंद्याचे नीतिशास्त्र चांगले रुजले आहे. व्यवसाय व धंद्याच्या सीमारेखा त्यांनी निश्चित केल्या आहेत. पर्यावरणाच्या नीतिशास्त्रातील समस्या जागतिक आहेत. युद्ध, आंतरराष्ट्रीय संबंध, नववसाहतवाद, रासायनिक-आण्विक प्रकल्प, माहिती तंत्रज्ञान, संगणक, राजकारण, समाजकारण, हे जागतिक प्रश्न आहेत.

उपयोजित नीतिशास्त्र जसजसे विकासीत झाले तसे युद्धाचे नीतिशास्त्र, सार्वजनिक धोरणांचे नीतिशास्त्र, उद्योगसमूहाचे, व्यवस्थापनाचे, राजकारणाचे, समाजकारणाचे नीतिशास्त्र रचले गेले. यातील प्रत्येक क्षेत्र अतिशय व्यापक असल्याने त्यातील जवळपास प्रत्येक घटकाचे नीतिशास्त्र रचावे लागले. व्यक्तिगत पातळीवर सरकारी-निमसरकारी-खासगी-नोकरांचे नीतिशास्त्र (उदाहरणार्थ माधव गोडबोले यांनी 'लोकसत्ता आयडिया एक्सेंज' मध्ये मांडलेला गोपनीयतेचा मुद्दा,) पोलिसांचे नीतिशास्त्र, शिक्षक-प्राध्यापकांचे नीतिशास्त्र, पत्रकारांचे नीतिशास्त्र, लाचलुचपतीतील नीति, भेटी देण्याघेण्यातील नीतिशास्त्र, लेखकाचे नीतिशास्त्र (उदा. भालचंद्र नेमाडेंचा नवनैतिकतावाद व देशीवाद, काहीजणांचा न-नेमाडेवाद, आणखी काहीजणांचा नेमाडे द्वेषवाद, नेमाडेपंथीयांचा प्रतिद्वेषवाद), विषयानुसार- विज्ञानाचे नीतिशास्त्र, नवतंत्रज्ञानाचे नीतिशास्त्र, अभियांत्रिकी-जैव अभियांत्रिकीचे नीतिशास्त्र, संगणकाचे नीतिशास्त्र, धर्माचे नीतिशास्त्र, भाषेचे नीतिशास्त्र, ज्ञानाचे नीतिशास्त्र, स्त्रीवादाचे नीतिशास्त्र, माहिती अधिकाराचे नीतिशास्त्र, शेतीचे नीतिशास्त्र, अशी अनेक नितीशास्त्रे अस्तित्वात आली. या खेरीज दारिद्य, भूकबळी, अश्लील साहित्य निर्मिती उद्योग, वेश्याव्यवसाय, स्थलांतरितांचे प्रश्न, फाशी, नागरिकांचा खासगीपणा, जागल्या अशा प्रश्नांमागील नैतिकता या निमित्ताने ऐरणीवर आली आहे.

## १.ब) पर्यावरणाचे नीतिशास्त्र

पर्यावरणाचा विचार 20 व्या शतकाच्या प्रारंभीच सुरु झाला होता. त्याला वेग आला तो 1960. नंतर जीव नीतिशास्त्र आणि पर्यावरणीय नीतिशास्त्र या दोन्हींचा विचार 1960 च्या दशकात गांभीर्याने सुरु झाला ही दोन्ही क्षेत्रे परस्परांशी निगडीत होती. पर्यावरण नीतिशास्त्र मुख्यतः या निसर्गाशी, पृथ्वीशी आणि विश्वाशी असलेल्या आपल्या संबंधाच्या कथेची आणि मूल्यात्मकतेची चर्चा करते. संक्षेपात *"मानव आणि निसर्ग यांचा नैतिक संबंध काय आहे ? "* असा प्रश्न पर्यावरण नीतिशास्त्र विचारते.

### पर्यावरण नीतिशास्त्राचा उदय [2]

पर्यावरणाचा विचार पर्यावरणवाद आणि पर्यावरण अध्ययन यात होतो. पण पर्यावरण नीतिशास्त्र त्या पेक्षा भिन्न दृष्टीकोनातून मानव आणि परिसर यांच्या नात्याचा शोध घेते. पर्यावरणवाद) Environmentalism (हा पर्यावरणविषयक विविध सिद्धांत ,पर्यावरण प्रणाली आणि सामाजिक चळवळी यांचा समावेश असलेले व्यापक स्वरूपाचे तत्त्वज्ञान आहे .दबावगट स्थापन करणे ,चळवळी करणे आणि प्रशिक्षण देणे ही कामे पर्यावरणवाद करतो. पर्यावरण अध्ययन (Environmental studies) ही वैज्ञानिक दृष्टीकोनातून पर्यावरणाचा अभ्यास करणारी विज्ञान शाखा आहे. नैसर्गिक पर्यावरण आणि मानव निर्मित पर्यावरण (मोठे कारखाने, उद्योगधंदे, व्यवसाय, राहणीमानामुळे होणारा भाजीपाला कचरा ते अणुकचरा इत्यादी) यांचा पृथ्वीवर, सजीवांवर होणारा परिणाम यांचा शास्त्रीय अभ्यास यात होतो.

पर्यावरण नीतिशास्त्र हा पर्यावरण तत्त्वज्ञानाचा हिस्सा आहे. नीतीविषयक विचारांची कक्षा केवळ मानवापुरती न ठेवता, मानवांसह मानवेतर सजीवांनाही सामावून घेईल अशी आणि इतकी व्यापक करावी, असे मध्यवर्ती धोरण

---

[2] श्रीनिवास हेमाडे " पर्यावरण नीतिशास्त्र " तत्त्वभान लेखांक ४३, ०६ नोव्हेंबर २०१४ लोकसत्ता

---

स्वीकारावे; असा धोरणात्मक नैतिकतेचा आग्रह धरणारी ही उपयोजित नीतिशास्त्राची शाखा आहे. पर्यावरणविषयक कायदे, पर्यावरण समाजशास्त्र, पर्यावरण धर्मशास्त्र, पर्यावरण अर्थशास्त्र, पर्यावरण भूगोल आणि खुद्द पर्यावरण विज्ञान अशा अनेक सामाजिक व नैसर्गिक विज्ञानांचा चिंतन विषय असणारी हे अंतरविद्याशाखीय नीतिशास्त्र आहे. या नीतीशास्त्राशी जैवनीतीशास्त्र, व्यावसायिक नीतीशास्त्र, धंद्याचे नीतीशास्त्र आणि अभियांत्रिकी नीतीशास्त्र यांच्याशी अतिशय गुंतागुंतीचा संबंध पोहोचतो.

पर्यावरण नीतीचा अभ्यास सुरु झाला तेंव्हा त्यास पर्यावरण नीतिशास्त्र असे नाव नव्हते .१९१५ ला डॉ.अल्बर्ट श्वायत्झर (१८७५-१९६५) या जर्मन डॉक्टर तत्त्ववेत्त्याने मांडलेला" जीवनविषयक पूज्यभाव "(The Reverence for Life) हा विचार जगातील पहिला पर्यावरणनीतीचा विचार मानला जातो .जीवन या संकल्पनेत श्वायत्झर यांनी पृथ्वी आणि सर्व सजीव सृष्टीचा समावेश केला. मानवी जीवनाविषयीचा पूज्यभाव, श्रध्दा आपणास असतातच,एवढेच नव्हे तर न दिसणाऱ्या अज्ञात ईश्वराविषयी तर कमालीचा पूज्यभाव असतो.पण त्याच बरोबर आपण सृष्टीतील विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, वनस्पती यांच्यविषयीही पूज्यभाव बाळगला पाहिजे,अशी मांडणी त्याने केली.हे विचार म्हणजे सर्व सजीव सृष्टीचे समर्थन करणारे पहिले नीतीशास्त्र होय. *The Reverence for Life* हा वाक्यप्रयोग त्यांनीच वापरला. श्वायत्झर[3] म्हणतो '' खरे तत्वज्ञान हे जाणीवेविषयीच्या तात्काळ व व्यापक सत्यांच्या पासून सुरु झाले पाहिजे. नीती जीवनाविषयी आदर दाखविण्यात सामावलेली आहे. *The Reverence for Life* हे मुलभूत नीतीतत्व आहे. जीवन पवित्र मानले पाहिजे." "It is good to maintain and cherish Life, it is an ail to destroy and to check Life. That man is really ethical who is careful not to crush any insect as he walks. " अल्बर्ट श्वायत्झर चा विचार हा पर्यावरणविषयक नीतिचा पहिला विचार होय.

त्यानंतर पॉल टेलर) १९२३ (.. या अमेरिकन विचारवंताचा" निसर्गाविषयीचा आदर "सिद्धांत ,आल्डो लिओपोल्ड) १८८७ -१९४८ (या विख्यात पर्यावरण तत्त्ववेत्त्याच्या दि सॅण्ड कौंटी अल्मॅनक) १९४९ (या पुस्तकातील भूमि नीति (Land Ethics (सिद्धांत आणि राशेल कार्सन या सागर जीवशास्त्रज्ञ विदुषीच्या Silent Spring) १९६२ ( या पुस्तकांनी या विषयाला तोंड फुटले .नंतर *Science* या अमेरिकन नियतकालिकात " दि हिस्टॉरिकल रुट्स ऑफ आवर इकोलॉजिक क्रायसिस) १९६८ ( या लिन व्हाईट्स आणि गॅरट हार्डीन या प्राणीशास्त्रज्ञ पर्यावरणतज्ञाच्या )१९१५-२००३ " (दि ट्रॅजेडी ऑफ दि कॉमन्स) " १९६८ (या निबंधानी आणि" एक्सप्लोरिंग न्यू एथिक्स फॉर सरव्हायवल :दि व्हायेज ऑफ दि स्पेसशीप बिगल) १९७२(, या पुस्तकाने या विद्याशाखेचा अभ्यासाचा पाया रचला . विशेषतः राशेल कार्सनने डी.डी.टी .व इतर रासायनिक औषधांमुळे पिके विषारी बनणे ,मानव व मानवेतर प्राणी नष्ट होण्याचा सिद्धांत मांडला. नंतर पॉल एलरीचच्या The Population Bomb या पुस्तकाने भर घातली .आणि १९७० च्या पहिल्या जागतिक वसुंधरा दिन परिषदेनंतर पर्यावरणाचे नीतिशास्त्र या यथार्थ नावाने ही नवी विद्याशाखा अस्तित्वात आली .स्कॉटीश भूगर्भ शास्त्रज्ञ जेम्स हटन) १७२६-१७९७(, ब्रिटीश शास्त्रज्ञ जेम्स लव्हलॉक) १९१९ .( रशियन भूरसायनशास्त्रज्ञ व्लादिमिर वेर्नाद्स्की) १८४५-१९६३(, ब्रिटीश पत्रकार -छायाचित्रकार गाय मूरची )१९०७-१९९७ (आणि अमेरिकन महिला जीवशास्त्रज्ञ लिन मार्गुलीस(१९३८-२०११) ,ब्रिटीश तत्त्ववेत्ते स्टीफन

---

[3]अल्बर्ट श्वायत्झर यांच्या सारखाच दृष्टीकोन पॉल टेलर(Paul W. Teller) या आधुनिक अमेरिकन तत्वज्ञाने घेतला आहे. टेलर त्यांच्या *Respect for Nature: A Theory of Environmental Ethics* (Princeton University Press, 1986) या पुस्तकात म्हणतात की प्रत्येक सजीव प्राणी आपल्या स्वतःच्या पध्दतीने स्वतःचे कल्याण करुन घेण्याचा प्रयत्न करत असतो. आपल्या जीवनाला जे मूल्य आहे तसेच मूल्य सर्व जीवांना व त्याच्या जीवनाला असते, हे तत्व माणसाने लक्षात ठेवले पाहिजे.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

क्लार्क) १९४५ ( यांच्या पर्यावरणविषयक मांडणीतून विसाव्या शतकात गैय्या नीतिशास्त्र विकसित झाले .गैय्या )Gaia (म्हणजे ग्रीक भाषेत पृथ्वी किंवा भूदेवी.१९७० साली अमेरिकेत Environmental Ethics हे नियतकालिक सुरु झाले .


## पर्यावरण नीतिशास्त्राच्या समस्या

पर्यावरण नीतिशास्त्र मुख्यतः पाच समस्यांचा अभ्यास करते.

(१) विविध प्रकारचे प्रदूषण
(२) नैसर्गिक साधन संपत्तीचा दुरुपयोग
(३) वाढती लोकसंख्या
(४) प्राण्यांविषयी माणसाची अभिवृत्ती आणि माणूस त्यांना देत असलेली वागणूक
(५) विविध प्रकारच्या पर्यावरण प्रणालींचे स्वयंसिद्ध मूल्य.

पर्यावरण नीतिशास्त्र या विद्याशाखेत ईश्वरकेंद्रवाद, मानवकेंद्रवाद, जैवकेंद्रवाद आणि पर्यावरण केंद्रवाद हे निव्वळ ॲकेडेमिक सिद्धांत आणि प्राण्यांचे हक्क, शाकाहारवाद, प्राण्यांवरील प्रयोगांबाबत नैतिक धोरणे तसेच शाश्वत विकास ही संकल्पना, उथळ पर्यावरणवाद विरुद्ध सखोल पर्यावरणवाद हे चळवळीतून निष्पन्न होणारे मुद्दे अभ्यासले जातात. अर्थात विविध देशातील विद्यापीठांच्या व सरकारच्या धोरणांनुसार काही बदल होतात. पण साधारणतः हे समान मुद्दे असतात.

**Albert Schweitzer**
(14 January 1875 – 4 September 1965) German and then French theologian, Organist, philosopher, physician, and medical missionary.
Received the 1952 Nobel Peace Prize for his philosophy of "Reverence for Life"





**Aldo Leopold**
(January 11, 1887 – April 21, 1948) an American author, scientist, ecologist, forester, and environmentalist.

**Rachel Louise Carson**
(May 27, 1907 – April 14, 1964)
An American marine biologist and conservationist



Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

## पर्यावरण नीतिशास्त्राचे महत्त्व

**नैतिकतेच्या कक्षा रुंदावल्या / व्यापक झाल्या.**

पाश्चात्य नीति परंपरा मानवकेन्द्री गृहीतकावर आधारलेली आहे.' विश्वात सर्वोत्तम महत्वाची गोष्ट म्हणजे केवळ माणूसच ' ही मानवकेंद्री धारणा होय.हीला सर्व जगात धार्मिक आधारही मिळाला.' हे विश्व ईश्वराने केवळ माणसासाठी - आपला पुत्र / प्रतिकृती च्या सुखासाठी - निर्माण केले आहे ' अशी धारणा सर्व ईश्वरवादी धर्मांनी रुजविल्याने एकूण सर्वच चिंतन मानवकेंद्री (Anthropocentric) बनले. 20 व्या शतकापर्यंत कायम असलेले या गृहीततत्वामुळे नीति ही देखील मानवकेंद्रीतच असली पाहिजे,असा अट्टाहास बनला.त्याची सुरुवात प्रोटोगोरस (इ.स.पू.490 - 420 )या तत्त्वज्ञाच्या *Man is the measure of all things* या वचनापासून सुरु होते.

आधुनिक विज्ञानाचा जनक म्हणून ओळखला जाणाऱ्या लॉर्ड फ्रान्सिस बेकनने (1561-1626 ) ' विज्ञान ही निसर्गाविरुध्दची लढाई असून निसर्गाची सर्व रहस्ये मानवाने भेदलीच पाहिजेत' असे तत्त्वज्ञान मांडले.(आज अश्लील वाटेल अशी भाषाही तो या संदर्भात वापरतो.) इथूनच निसर्गाविरुध्द राजकारण सुरु झाले.पुरुष प्रधान संस्कृतीचे प्रतिमान वापरले जावून निसर्गाचे शोषण सुरु झाले.त्याची परिणती म्हणून "नैतिक संबंध केवळ मानवालाच लागू असतात. कारण विचारशीलता, इच्छास्वातंत्र्य व कृतीस्वातंत्र्य या गोष्टी केवळ माणसातचं आहेत.माणूसच नीतिमान असतो.नीति माणसाची गुलाम आहे.मानवेतर प्राण्यात किंवा निसर्गात या गोष्टी नाहीत.निसर्गाचे चलनवलन काही नियमांनीच चालते. हेच नियम प्राण्यांना लागू आहेत.त्यामुळे नैतिकता ही गोष्ट त्यांना लागू होत नाही, " अशी विचारसरणी आली.

मध्ययुगातीलच दुसरा महत्वाचा तत्त्वज्ञ रेने देकार्तने (1596-1650) शरीर व मन यांच्यात सुस्पष्ट विभागणी केली.त्यांच्यातील आंतरसंवाद मांडला.मन अथवा आत्मा केवळ माणसालाच असतो,असा बुध्दिवाद मांडला.देकार्तला ***'आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक'*** म्हणतात.पण त्याने प्राण्यांना मन नसते,प्राणी केवळ प्रजोत्पादन करणारी मांसल यंत्रे असतात,असा ही निष्कर्ष काढल्याने प्राणीहत्येचे नवेच हिंसक तत्त्वज्ञान जन्माला आले आणि प्राणीहत्या अधिकृत झाली.

अशा रितीने प्राचीन काळापासून मध्ययुगीन बुध्दिवादामार्फत विसाव्या शतकापर्यंत " माणूस हेच सर्व सुखाचे साध्य आहे. त्यामुळे साहजिकच निसर्ग व प्राणी माणसाच्या सुखाची साधने आहेत. माणसांना विवेक आहे, बुध्दी आहे. निसर्ग व प्राणी यांना ती नाही. आणि साधनांचा वापर कसा करावा, हे बुध्दिच्या साह्याने ठरवावयाचे असत " अशी पारंपरिक नीती रचली गेली.तिला 20 व्या शतकात जबरदस्त धक्का बसला.कारण नव्या नीतित मानवासह सर्व सजीव,पृथ्वी व विश्वाचा समावेश झाला.

## १.३ मानवकेंद्रवाद, जैवकेंद्रवाद, पर्यावरणकेंद्रवाद.

### १.३.१: मानवकेंद्रवाद *(Anthropocentrism)*

Anthrop म्हणजे विकसित माणूस. Anthropology म्हणजे मानव वंश शास्त्र हे शास्त्र गेल्या शतकात विकसित झाले. तथापि विश्वाविषयीचा मानवकेंद्रीवाद प्राचीन काळापासून मांडण्यात आलेला आहे.मानवकेंद्रवाद म्हणजे मानवेतर प्राण्यांना वगळून व केवळ मानव हाच केंद्र आहे, असे मानून ज्ञानाची रचना करणे हा वाद केवळ मानवी मूल्ये महत्त्वाची मानतो. म्हणून मानवकेंद्रवाद म्हणजे मानव हाच विश्वाचा केंद्रबिंदू आहे,असे सांगणारा वाद.

उपयोजित नीतिशास्त्रात या संज्ञेचा उपयोग मानवी कल्याण साधणाऱ्या विविध प्रकारच्या कृती, अभिवृत्ती व मूल्ये यांचे वर्णन करणारा या अर्थाने येतो. हे कल्याण निसर्गातील पशुपक्षी व संपूर्ण पर्यावरण ही सुखाची साधने ओत. असे समजून केली जाते. यपर्यावरण नीतिच्या संदर्भात मानव केंद्रवादाबाबत 4 मुद्दे आहेत, ते पुढीलप्रमाणे :

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

1) मानवतावादाचे पारंपरिक समर्थन.त्या वरील टिका / चिकित्सा.
2) मानवतावादास पर्याय.
3) मानवतावाद विरुध्द अमानवीयता.

**पारंपरिक मानवकेंद्रवाद**

नीति ही केवळ मानवी कल्याणासाठी असते. तो फक्त मानवी व्यवहार आहे. नैतिक समाज केवळ माणसांचा असतो. त्यात मानवेतर पशु-पक्षांचा समावेश होऊ शकत नाही, असे समजतो. कारण आत्मा, बुध्दीमत्ता आणि भाषा या तीन गोष्टी माणसांमध्ये प्राण्यांपेक्षा अधिक व उच्च दर्जाच्या आहे. असे मानवतावाद मानतो. त्यामुळे मानवी कल्याण्यासाठी व सुखासाठीच मानवेतर पशु-पक्षी आणि निसर्ग यांचा वापर झाला पाहिजे.

पाश्चात्य विचारांमध्ये असा मानवतावाद प्राचीन काळापासून आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल, प्लॉटिनस ते ॲक्वीनास पर्यंत अनेक पाश्चात्य विचावंतांनी मानव केंद्रवाद मांडला. ग्रीक व पाश्चात्य विचारात या संदर्भात अस्तित्वाची भव्य शृंखला मांडण्यात आला आहे. यानुसार ईश्वराने सर्व पशु पक्षांची रचना उतरत्या श्रेणीने केली आहे. परीपूर्णता ईश्वरापासून वनस्पतीपर्यंत उतरत्या श्रेणीची आहे. आधी स्वतः ईश्वर देवदूत - प्रतिकृती म्हणून माणूस - प्राणी - वनस्पती असा हा क्रम आहे जो. जास्त परिपूर्ण असेल तो खालच्यांवर राज्य गाजवेल. अशीही देवदत्त रचना आहे. तीच नीती होय. प्राण्यांना नसलेला आत्मा माणसांना असतो. माणूस हा ईश्वराची प्रतिकृती आहे, ख्रिश्चन व ईस्लाम या धर्माच्या मते, ईश्वराने तर माणूसच श्रेष्ठ आहे. जगाची निर्मिती मानवी सुखासाठीच झालेली आहे. आत्मा हे वेगळे वैषिष्टय केवळ माणसालाचं ईश्वराने दिलेले आहे.

ईश्वराने माणसाला आत्मा दिला तशी बुध्दीही दिली. बुध्दीमत्ता हा केवळ माणसाचा गुणधर्म असून बुध्दीच्या जोरावर त्याने या जगावर अधिराज्य गाजविले आहे. संस्कृती निर्माण केली आहे.बुध्दी हेच माणसाचे सामर्स्थ आहे.माणसाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे भाषा हे आहे. बुध्दीचा अविष्कार होण्यासाठी संकल्पना मांडाव्या लागतात. संकल्पना भाषेशिवाय शक्य होऊ शकत नाही. भाषा ही जणूकाही दैवी देणगी आहे. डेकार्त, कांट यांच्या मते, संकल्पनसा भाषेतूनच मांडाव्या लागतात. आणि ही क्षमता फक्त माणसातच आहे.

अशा रितीने आत्मा, बुध्दी व भाषा ही मानवी वैशिष्टये असल्याचे पारंपरीक मानवतावाद सांगतो. म्हणून नीतिची, मूल्य व्यवस्थेची रचना मानव केंद्रीच असली पाहिजे. माणूस हाच विश्वाचा केंद्रबिंदू असून तोच साध्य आहे तर इतर जग त्याचे साधन आहे. प्रोटागोरास हा तत्त्वज्ञ म्हणतो. *Man is the measure of all things* ते ह्यासाठीच. ही कल्पना विविध प्रकारच्या बौध्दिक क्षमता आणि धारणा स्पष्ट करते सगळे जग फक्त माणसांसाठीच आहे. असे सांगते. माणूस विचार कसा करतो हे त्याचे उत्तम उदाहरण होय. म्हणूनच शेक्सपीयरचा हॅम्लेट म्हणतो की, या जगात चांगले किंवा वाईट असे काहीही नसते. पण आपला विचार त्याला तसे बनवितो.

वरील कारणांमुळे मानव केंद्रवाद स्विकारावा असा आग्रह केला जातो. नव्हे तो आपण स्विकारला पाहिजे. तो न स्विकारणे ही चूक ठरेल. तत्त्वतः व व्यवहारात सुध्दा नीतिचा वाहक म्हणून केवळ माणूसच असू शकतो, इतर प्राणी असू शकत नाही. असे मानवतावाद सांगतो. शिवाय निसर्ग व निसर्गातील घटकांचा जीवनक्रम पाहता एक जीव दुसऱ्यासाठी जगतो, असेच आढळते. मांजरीने खाल्ले म्हणून उंदीर जसे मांजरीवर टीका करु शकत नाही तसे माणसाने खाल्ले म्हणून माणसावर टीका करु नये. कारण माणूस श्रेष्ठ आहे.

**मानवकेंद्रवादाची चिकित्सा**


मानवतावाद माणसाचे गुणगान गात असला व कितीही समर्थनीय असला तरी त्यात अडचणी आहेत. मुळात ही पृथ्वी ईश्वराने माणसाला आंदण दिली हे गृहीततत्त्वच चुकीचे आहे. उदा. बौध्द, जैन व हिंदू हे धर्म व त्यांचे तत्त्वज्ञान मानवतावादाचा वरील दावा फेटाळून लावते. इतर पशू पक्षांनाही माणसाचा सारखाचं जगण्याचा अधिकार आहे. प्रत्येक जीव इतरांशी सुसंवाद राखू जगू शकतो अशी मांडणी केली जाते. उलट प्राण्यांमध्ये नसलेली विचारशक्ती माणसाकडे

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

असल्याने माणसाची जबाबदारी जास्त आहे. माणसाने हे ओळखले पाहिजे की, पशुपक्षी व निसर्ग हे त्याच्या अस्तित्वाचाच भाग आहे, असे हे तीनही धर्म सांगतात. या तीन भारतीय संप्रदायाचा प्रभाव गेल्या शतकात अमेरिकेसारख्या मदांध देशावर पडून काही अमेरिकांनी पृथ्वी हाच एकमेव सजीव ग्रह असून त्याचे रक्षण केले आहे. असा विचार मांडला. त्यासाठीच 1980 च्या दशकापासून वसुंधरा दिन साजरा करण्यात येऊ लागला.

मानवकेंद्री गृहीत तत्त्वांना आधुनिक विज्ञानाने आव्हाने दिली आहे. उलट अस्तित्वाची भव्य शृखला चुकीची व गैर समजावर आधारलेली असल्याचे 18 व्या शतकात *Linakeus* या विषशास्त्रज्ञाने आणि 19 व्या शतकात चार्ल्स डार्विन याने सिध्द केले. डार्विनच्या मते, सजीवांमधील नैसर्गिक निवडीची प्रक्रिया ही काही इतर प्राण्यांना नष्ट करुन स्वतः जीवंत राहण्यासाठी होत नसते. इतर प्राण्यांच्या तुलनेत स्वतः काहीतरी चांगले निर्माण व्हावे, म्हणून काही मानवी प्रगती निर्माण होत असते. मानववंशशास्त्र आणि सामाजिक विज्ञानांमधील काही शोधांनी असे दाखविले आहे की, बुध्दी, भाषा आणि सामाजिक नाती ही केवळ माणसांमध्येच नसून इतर प्राण्यांमध्येही आढळतात. प्रत्येक पशु पक्ष्यांच्या जातीला स्वतःची एक सांकेतिक भाषा असते. हत्ती हा सर्वात बुध्दीमान तर चिपांझी हा सामाजिक नाती असलेला प्राणी आहे. हे प्राणी सुध्दा त्यामुळे काही नैतिक धारणा मार्ग अवलंबितात.




**Carl Linnaeus**
(23 May 1707 – 10 January 1778)
A Swedish botanist, physician, and zoologist,
Laid the foundations for the modern scheme of binomial nomenclature.
Known as the father of modern taxonomy, and considered one of the fathers of modern ecology.

अशा रितीने मानवतावाद हा अत्यंत संकुचित असून तो केवळ **मानव स्वार्थवाद** आहे. शिवाय तो अशास्त्रीय आणि अनैसर्गिकही आहे, अशी टिका त्यावर करण्यात येते. त्यामुळे त्यास पर्याय सुचविण्यात आला आहे. तो पुढीलप्रमाणे :

**मानवतावादास पर्याय**

मानवतावादावर वरीलप्रमाणे आक्षेप घेतलेले हा वाद स्वार्थी आणि इतर सजीव सृष्टीला केवळ साधन समजत असल्याने तो स्विकारणे योग्य नाही, असे माणण्यात आले. मानव केंद्रवाद हा फक्त मानवी हितसंबंधच जपणारा आहे. असे लक्षात आल्यामुळे तो नाकारण्यात आला किंवा त्यात सुधारणा करण्यात आली ती पुढीलप्रमाणे :

मानवतावादास पर्याय देता येतो. केवळ हितसंबंध जपण्यापेक्षा मानवी हितसंबंधाचे सुव्यवस्थित पुर्नमुल्यांकन करावे व या हितसंबंधात सर्व सजिव सृष्टीचा समावेश करावा असा विचार मांडण्यात आला. प्राण्यांही सुख-दुखाच्या भावना असतात. त्यामुळे त्यांचा नैतिक विचार होऊ शकतो. माणसाचे हित विविध प्रकारच्या पर्यावरण प्रणालींचे रक्षण, सजीवांचे रक्षण व संबर्धन ंतसुध्दा आहे. माणसाचे भावजीवन, त्याचे विविध प्रकारचे सांस्कृतिक अविष्कार या सजिव पर्यावरण प्रणालींशी निगडीत आहे. असे मुद्दे मांडण्यात आले. आणि पर्यायी मानवतावादाची मांडणी करण्यात आली. यांत तीन मु- यांचा समावेश होतो.

1) प्रत्येक सजीवाचे मूल्य.
2) मूल्यवान अस्तित्व
3) पर्यावरण प्रणालींचे मूल्य

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College Sangamner, Dist. Ahmednagar
Cell no. 9226563052, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com

---

प्रत्येक सजीवास सुख दुखाच्या भावना आहेत. त्याला आनंद दुःख अनुभवता येतात. म्हणून जरी प्राणी स्वतः कोणतीही नीति व्यवस्था विकसित करु शकले नाहीत. तरीही मानवी व्यवस्थेत त्यांना स्थान देता येते. प्रत्येक सजीवास हे स्वयंमूल्य आहे. सजीवांचे जीवन मानवी जीवनाप्रमाणे मानसशास्त्रीय, भावनीक व सामाजिक असते. याचाच अर्थ त्यांना मूल्य आहे.

हे मूल्य केवळ सजीवांना आहे असे नव्हे तर वनस्पतीना आहे. वनस्पती श्वासोश्वास करतात. त्यांना वाढ आहे. ते स्वावलंबी आहे. पुर्ननिर्मिती क्षम आहे आणि त्यांना मानवी भावनांना प्रतिसाद देता येतो. हा सिध्दांत भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस आणि अलीकडे रॉबिट ॲटफिल यांनी मांडला. वनस्पती या एकूण अस्तित्वाचा भाग आहे. त्यांना मूल्य देणे, म्हणजे श्वायत्झर म्हणतो तसे अस्तित्वाविषयी पूज्यभाव बाळगणे.



**Sir JagadishChandra Bose**
(30 November 1858 – 23 November 1937)
A Indian polymath:
a physicist, biologist, botanist, archaeologist, as well as an early writer of science fiction.
Pioneered the investigation of radio and microwave optics, and laid the foundations of experimental science in the Indian subcontinent

आता केवळ वनस्पतींमध्ये तर निर्जीव वस्तूंना सुध्दा आपण नैतिक वागणूक दिली पाहिजे. दगड-धोंडे, पर्वत, नदया, ओढे, विविध प्रकारचे ऋतू आणि सर्वच प्रकारच्या नैसर्गिक घटना या सर्वांनांच एक नैतिक मूल्य आहे. ते मानवी वास्तत्वाविषयीची व मानवी भावविश्वाची रचना कणार घटक आहे. या संदर्भात आल्डो लिओपोल्डची भूमि नीति महत्वाची आहे.

## १.४ आल्डो लिओपोल्ड यांचे भूमि नीतिशास्त्र[4]

जमिन विचार करू शकत नाही.मग ती स्वतःला घडवणार तरी कशी ? आपण कसे राहावे, कसे घडावे ; असा विचार माणूस करतो. वस्तूंना ते शक्य नसते.पण जमिन स्वतःला घडवित असते, असे लक्षात येते.योग्य पाणी पुरवठा आणि मशागती अभावी जमिन नापिक होते.पण शेकडो वर्षांच्या (अंदाजे चारशे वर्षे) कालावधीनंतर ती पुन्हा सुपीक बनते, हा अनुभव माणूस घेतो. हे नेमके कसे घडते ? या घटनेचा माणसाने कसा, कोणता आणि का विचार करावा ? जमिनीच्या या सजीवीकरणाशी पर्यावरण प्रणालीचा काही संबंध आहे का ? त्यात माणसाची भूमिका कोणती असते व असावी ? याची मांडणी जगात प्रथम आल्डो लिओपोल्ड या अमेरिकन वनसंरक्षक अधिकाऱ्याने आणि पर्यावरणतज्ञाने केली. तिला ' भूमि नीति ' म्हणतात.

---

[4] श्रीनिवास हेमाडे, "पर्यावरण नीति : श्वायत्झरचा जीवनविषयक पूज्यभाव, आल्डो लिओपोल्डची भूमि नीति आणि स्टीफन क्लार्कची गैय्या नीति", पद्मगंधा दिवाळी २०१४, प्रकाशक – अरुण जाखडे,पुणे.

---

आल्डो लिओपोल्ड (11 जानेवारी 1886 - 21 एप्रिल 1948) यांनी A Sand County Almanac (1949) या पुस्तकात ' भूमिनीति ' (Land Ethics) या विषयाची मांडणी केली.पर्यावरण नीतिचा भाग म्हणून भूमिनीति वैचारिक क्षेत्रात प्रसिध्द झाली. लिओपोल्डच्या या विचारांवरच जगातील पर्यावरणवाद, वन्यजीव व्यवस्थापन, पर्यावरण प्रणालीवाद विकसित झाला.

लिओपोल्डच्या मते माणसाचा मूल्यविचार केवळ काही मानवी समाज यांच्यापुरताच असू नये, तर त्यात ही एकात्म पृथ्वी आणि तिच्यावरील विविध तऱ्हांच्या पर्यावरण प्रणाली यांचाही समावेश असला पाहिजे.हा विचार म्हणजे पर्यावरणीय सदसद्‌विवेकशीलता होय.

मानवी व्यक्ती कधीही एकटी,सुटी नसते.ती सर्व मानवी समाजाचा एक घटक असते.समाज म्हणजे विविध प्रकाराच्या घटकांचे परस्परावलंबी जाळे असते.तो मोठा परिवार बनतो.हा परिवार भूतकालिन,वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन सर्व मानवी व्यक्तींना जोडतो. त्याप्रमाणे जमिन हा एक मोठा परिवार असून जमिनीवर राहणारे सर्व जीवअजीव त्या परिवाराचे घटक आहेत.

आल्डोच्या मते, 'जमिन' ही निसर्गातील अतुलनीय घटना असून तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. जमिन म्हणजे खरेदीविक्रीची,युध्द करण्याची बाजारु वस्तू नव्हे.जमिन म्हणजे स्वतःच एक मोठा परिवार आहे.माणूस ज्या निसर्गाच्या कुशीत जगतो तो सारा निसर्ग हाच तो परिवार आहे.जमीन, पाणी हे मूलघटक आहेतच, पण पाळीव प्राण्यांबरोबरच जंगली प्राणीसुध्दा त्या परिवाराचे सदस्य असतात. सर्व जैविक (सजीव) आणि अजैविक (निसर्ग) घटकांचा मिळून हा परिवार बनतो. या परिवाराची नीति ती ' परिवार नीति ' होय. जमीन हा तिचा मुख्य घटक असल्याने या नीतिला आल्डो 'लॅण्ड एथिक्स ' (*Land Ethics* ) असे म्हणतो.

पर्यावरणाचे संरक्षण करणे हा माणूस आणि भूमि परिवार यांच्यातील सुसंवाद असतो. या सर्व घटकांनी परस्पर सुसंवादी जीवनाचे सातत्य राखणे हीच भूमिनीति असते.ती नैसर्गिकरित्याच प्रवाही असली पाहिजे.आजचा माणूस ही भूमि परिवाराचा विजेता नव्हे तर या परिवाराचा नम्र सदस्य बनला पाहिजे. त्याने निसर्गाविषयी आदर व प्रेम दाखविले पाहिजे तरच हे सारे सदस्य व भूमिमाता माणसाचे अस्तित्व टिकवतील अन्यथा परिवार सदस्य एक एक करुन नष्ट होत गेले की माणसाची नष्ट होण्याची वेळ येईल ! माणूस पृथ्वीवरून नाहीसा होईल !! म्हणून माणसाने परिवाराचा नागरिक म्हणून वागावे. या परिवारातील कोणताही घटक सुटा, अलगपणे नांदू शकत नाही.तसा प्रयत्न केलाच तर सदस्य आणि शेवटी प्रयत्नकर्ताच नष्ट होतो.

थोडक्यात, ज्या पृथ्वीवर आपण नांदतो ती पृथ्वी व तिचा परीसर यांच्यात समतोल राखणारी जीवनप्रणालीचे संवर्धन व संरक्षण म्हणजे परीवार नीति होय. या जैविक परीवारातील स्थिरता, समतोल, एकात्मता व सौंदर्य राखणे, म्हणजे नैतिक जगणे आणि ते न राखणे म्हणजे अनैतिक वागणे. असे नैतिक वर्तन हीच जैविक विश्वाचे मूल्य आहे , असे लिओपोल्ड म्हणतो.त्यामुळे नैतिक मूल्य ठरवण्याचा अंतिम निकष म्हणजे, त्या परीवाराचे हीत व स्वाथ्य राखणे होय.माणसाने स्वतःपुरतेच केवळ आदर्शात्मक किंवा वर्णनात्मक किंवा कर्तव्यात्मक नैतिक जीवन जगणे म्हणजे नैतिक जगणे नव्हे तर आपला परीवार व्यापक करणे म्हणजे नैतिक जीवन जगणे.

लिओपोल्डची ही उपपत्ती विश्वातल्या प्रत्येक सजीव-निर्जीव घटकांना नैतिक मुल्य देतो. त्यांचे नाते-संबंध स्पष्ट करते. त्यातील एकात्मता सुसंवादीता राखते, ही नैतिक एकात्मता आहे. त्यामुळे या उपपत्तीला ''नैतिक एकात्मतावादी उपपत्ती'' (Ethical holism) असे म्हणतात.

Shriniwas Hemade, hodphilosophy, Sangamner College, Sangamner 422605 Ahmednagar.
Cell No. 915 865 80 66, shriniwas.sh@gmail.com, tatvajnanvibhaagsangamnercollege.yolasite.com/---

---

## १.५ शाश्वत विकासाची कल्पना.

'शाश्वत विकास' या संकल्पनेची चर्चा गेल्या शतकात सुरु झाली. अनिर्बंध विकासामुळे ही पृथ्वी व त्यावरीलमानवजात नष्ट होऊ नये, मानवाच्या भावी पिढ्याही भविष्यात प्रदीर्घ काळपर्यंत यापृथ्वीवर सुखाने नांदू शकायला हव्यात, हा अतिशय चांगला, स्तुत्य आणि उदात्त विचार त्यामागे आहे. शाश्वत विकासाची सैद्धांतिक मांडणी आणि त्यानुसार काय जीवनशैली असू शकेल त्याचे प्रयोगही सुरु झाले आहेत. १९८७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने प्रथम याविषयाला हात घातला त्यावेळी (१)आर्थिक (२)पर्यावरणीय (३) सामाजिक अशा तीन स्तरांवर कामकरण्याची गरज प्रतिपादित करण्यात आली. त्यानंतर २००१ साली (४) संस्कृती या चौथ्या बाबीची जोड देण्यात आली.

शाश्वत विकासाच्या मार्गावर वाटचाल करताना जगातीलसामान्य माणसांच्या गरजांना प्राधान्य मिळावे, त्यासाठी योग्य अशा तंत्रज्ञानाचा विकास, निरनिराळ्या स्तरावर आर्थिक- सामाजिक संघटना स्थापन करणे, विद्यमान आर्थिक- राजकीय संस्थांचे त्यासाठी सहकार्य मिळविणे, आणि स्थानिक लोकांचे सहकार्य मिळविणे, असा एकूण आराखडा तयार करण्यात आला.

शाश्वत विकासाचा विचार मांडताना संयुक्तराष्ट्रसंघाने सुयोग्य तंत्रज्ञानाचा विकास व वापर असेही एक सूत्र समोर ठेवलेहोते. तंत्रज्ञानाचा विकास, विस्तार, वापर, शिक्षण अन त्याकडे पाहण्याची दृष्टीयाची आज काय स्थिती आहे? ही स्थिती निराशाजनक आहे.

'शाश्वत विकास' ही संकल्पना हा नैसर्गिक साधनांचा वापर करण्याची धोरणे निश्चित करणारा आणि तातडीची व स्थलकालापलिकडील मानवी पिढीला जिवंत ठेवणारी शाश्वतता प्राप्त करणारा राजमार्ग मानला जातो. संतुलित आर्थिक विकास आणि मानवी विकास साध्य होईल असे समाज विकासाचे प्रारूप देणे, हे उद्दिष्ट असते. पृथ्वीवरील नैसर्गिक 'जैविक व्यवस्थेतील "एकात्मता, स्थैर्यता आणि सौंदर्य यांचे संवर्धन व विकसन होईल, असा विकास साधणे.

'शाश्वत विकास' ही संकल्पनेचा विचार १२व्या आणि १६ व्या शतकातील जंगल सुरक्षा व व्यवस्थापन कसे करावे, यात सापडतो. तथापि विसाव्या शतकात १९५० नंतर तिचा खरा विकास झाला. शाश्वत' (*sustainable*) ही संज्ञा सर्व प्रथम मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या अमेरिकन संस्थेतील डेनिस आणि डोनिला मिडोज (Dennis and Donella Meadows) या वैज्ञानिकांच्या नेतृत्वाखालील जागतिक विचारवंतांचा गटाने उपयोगात आणला. त्यांनी १९२ साली लिहिलेल्या "विकासाची मर्यादा" ("Limits to Growth") या अहवालात वापरला. हा अहवाल 'क्लब ऑफ रोम' या विचारगटातर्फे प्रसिद्ध करण्यात आला. या पुस्तकाची तातडीने तीस भाषांत रुपांतरे झाली. किमान एक कोटी वीस लाख प्रती विकल्या गेल्या. त्यांतर 'शाश्वत विकास' या संकल्पनेची व्याख्या अनेक प्रकारे करण्यात आली आहे. त्यात नॉर्वेचे पंतप्रधान ब्रून्टलँड यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या "आमचे समान भविष्य" )Our Common Future( या अहवालात १९८७ साली उपयोगात आणली गेली. ही व्याख्या व्याख्या सर्वमान्य मानली जाते. ही व्याख्या अशी: "भविष्यकालीन पिढीच्या गरजा भागवल्या जाण्याच्या क्षमता कसल्याही परिस्थितीत कमी होणार नाहीत, यासाठी कोणत्याही तडजोडी न करता ज्या विकास प्रतिमानात विद्यमान मानवजातीच्या गरजा पूर्ण होऊ शकतील, असा विकास साधणे म्हणजे शाश्वत विकास होय."

या व्याख्येत दोन संकल्पनांवर भर देण्यात आला आहे. गरजा आणि मर्यादा. गरजा याचा अर्थ जगातील गरिबांच्या आवश्यक गरजा पूर्ण होण्याला सर्वात कमालीचे प्राधान्य देणे आणि मर्यादा म्हणजे विज्ञान-

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

तंत्रज्ञान आणि विविध सामाजिक संघटनांनी विद्यमान व भविष्यकालीन गरजा यावर घातलेली बंधने स्वीकारणे.

अखिल जग-पृथ्वी )आणि सारे ब्रह्मांड) यांना एकच वस्तुजात समजणे, सारे जग ही एक व्यापक सुरचित व्यवस्था समजणे. ही व्यवस्था काळ आणि अवकाश यांनी एकत्र बांधलेली आहे, हे लक्षात घेऊन जगण्याचे धोरण आखणे, ही या संकल्पनेमागील गृहीतके आहेत. जगाला अवकाशातील व्यवस्था समजणे म्हणजे उदाहरणार्थ कोणत्याही भागातील प्रदूषण हे साऱ्या पृथ्वीचे असते आणि जगाला कालबद्ध व्यवस्था समजणे याचा अर्थ कोणतीही विद्यमान मानवी कृती भविष्यकालीन पिढीवर परिणाम करणारी आहे, हे लक्षात घेणे. अमेरिकेतली प्रदुषणाचा परिणाम आशिया खंडातील देशांवर होतो आणि आपले जीवनमान आपल्या आधीच्या आजीआजोबा, आईवडील यांच्या पिढीवर अवलंबून आहे; हे वास्तव लक्षात घेऊन आपल्या पुढील पिढीचे जीवनमान कसे असावे याचा विचार आपण आज करणे, आणि तसे वागणे.

या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन जगण्याचे प्रतिमान निश्चित करणे म्हणजे शाश्वत विकास करणे होय. यातून निष्पन्न होणारी तिसरी गोष्ट म्हणजे 'जीवनाची गुणवत्ता' ही व्यवस्था असते, हे मान्य करणे. जगणे उच्च दर्जाचे व्हावे यासाठी ते नियंत्रित, संयमित पण गरजा पूर्ण करणारे असावे, तृष्णा भागविणारे नव्हे.

शाश्वत विकास ही संकल्पना 'व्यवस्थात्मक चिंतन' कसे करावे, याचे प्रशिक्षण देणारी, त्यात मुळे असणारी आहे. ती 'आपले जगाशी (ब्रह्मांडाशी ) , इतर माणसे, प्राणी, वनस्पती यांच्याशी आपले नाते कसे असावे' याचे भान देते.

शाश्वत विकासासाठी खूप काही करता येवू शकते परंतु आपला विकास वेग गतीने वाढविण्यासाठी पुढील बाबींवर भर दिला पाहिजे.

1) आर्थिक विकासात समानता व सहभाग हे प्राणतत्त्व आहेत.

2) शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा असल्यामुळे शेती विकासाकडे दुर्लक्ष करता कामा नये.

3) आर्थिक सुधारणा करताना गरीबांना अनुकूल धोरणे राबविली पाहिजेत.

4) शेती, उद्योग व सेवा क्षेत्रे यामध्ये रचनात्मक बदल घडून आले पाहिजेत.

5) उत्पादक, रोजगार क्षमता वाढविण्यासाठी संरचनात्मक विकासावर भर दिला पाहिजे.

६)शिक्षणासारख्या क्षेत्रात संधीची समानता व गुणवत्ता यावर भर दिला पाहिजे.

पूर्व आशियाई राष्ट्रांचा अनुभव लक्षात घेवून सेवा उद्योगात क्षमता संवर्धन केले पाहिजे. सुधारणांची दिशा बदलून लाभांच्या वितरणाची नवी प्रणाली विकसित केली पाहिजे. महिलांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण करण्यावर भर दिला पाहिजे. उद्योगाचे विकेंद्रीकरण करून आर्थिक सुधारणातून नवे सामाजिक व आर्थिक राजकीय वातावरण तयार केले पाहिजेत. या सर्व सुधारणांची दिशा ही शाश्वत व सर्वसमावेशक विकासावर भर देणारी असली पाहिजे. शाश्वत विकास हा सर्वसमावेशक विकासाचा एक भाग बनला आहे. मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध साधनांचे विवेकी उपयोजन करणे गरजेचे आहे. सध्याच्या विकास योजना अशा पद्धतीने राबविल्या पाहिजेत की भावी पिढीच्या गरजासुद्धा योजकतेने पूर्ण होवू शकतील.

-----------------------------------------------------------------